# उजव्या सोंडेचा गणपती

२१ डिसेंबर २००४

आज जवळजवळ पंधरा वर्षांनी मी क्रिकेटचा कसोटी सामना प्रत्यक्ष पाहायला गेलो. वास्तविक क्रिकेट हा माझा आवडता खेळ आहे. सुट्टीच्या दिवशी आमच्या हाऊसिंग कॉलनीच्या क्रिकेट क्लबच्या सामन्यात मी उत्साहाने भाग घेतो. वेळ मिळाल्यास टी.व्ही.वर मोठे सामने-विशेषकरून कसोटी सामने - पाहायचा माझा प्रयत्न असतो. नाहीच जमले तर व्हिडीओ रेकॉर्डरवर सामन्यातले महत्त्वाचे प्रसंग पाहायला मला आवडते. परंतु सकाळ ते संध्याकाळ मैदानावर जाऊन सामना पाहायला मला वेळ मिळत नाही. म्युझियमच्या क्युरेटरचे कामच असे आहे!

परंतु आजची गोष्ट वेगळी होती. माझा शाळकरी मित्र प्रमोद रांगणेकर याचा हा शेवटचा कसोटी सामना होता. सीझन तिकीट पाठवून 'एखादा दिवस तरी मॅच बघायला ये' अशी त्याने कळकळीची विनंती केली होती. म्हणून मला सामना पाहायला हजर राहणे भाग होते. तो गोलंदाज असल्यामुळे भारताच्या क्षेत्ररक्षणाचा दिवस मी निवडला.

आज मॅचचा दुसरा दिवस होता. पहिल्या दिवशी भारताने ३०८ धावा काढून आपला डाव संपवला होता. कसोटी सामन्यांच्या मालिकेतला हा निर्णायक सामना होता. अनेक वर्षांनी एम.सी.सी.वर विजय मिळवण्याची संधी यंदा मिळेल अशी अनेक भारतीय क्रिकेटशौकिननांना आशा वाटत होती. ओलीसुकी जिंकून फलंदाजी घेऊन भारताने पाचशे-सहाशेच्या दरम्यान धावा कराव्यात अशी त्यांची अपेक्षा होती. कारण भारतीय गोलंदाजीचा एम.सी.सी.च्या फलंदाजांना पूर्ण सराव झाला होता. खुद्द रांगणेकरला आणि इतर काही गोलंदाजांना 'ड्रॉप' करावे असे अनेक टीकाकार सुचवीत होते. परंतु निर्णायक सामन्यात नवीन गोलंदाज वापरण्याचे धाडस सिलेक्शन बोर्डाला करवले नाही. तेच टीकाकार आज एम.सी.सी.चा संघ ३०८ चा आकडा सहज ओलांडेल असे भाकीत करत होते.

त्यांच्या अपेक्षेप्रमाणे एम.सी.सी.च्या फलंदाजीला सुरुवात झाली. आघाडीच्या फलंदाजांनी सावधगिरी आणि आक्रमक पद्धती यांचा सुंदर वापर करून पहिल्या तासात ४० नाबादचा स्कोअर गाठला. पेयासाठी दिलेल्या सुटीनंतर कर्णधार भंडारीने रांगणेकरला गोलंदाजी दिली. त्याचा शेवटचा सामना म्हणून प्रेक्षकांनी टाळ्यांनी त्याचे स्वागत केली. परंतु पुढे काय घडणार आहे याची कोणाला कल्पना होती?

रांगणेकरने पहिला आश्चर्याचा धक्का दिला अंपायर कालियांना. पूर्वीच्या अनुभवावरून 'राइट आर्म ओव्हर द विकेट' अशी गोलंदाजी रांगणेकर करील असे त्यांना वाटले आणि त्याप्रमाणे ते फलंदाजाला सूचना करण्याच्या बेतात असतानाच रांगणेकरने त्यांना सांगितले, 'मी लेफ्ट आर्म ओव्हर द विकेट बोलिंग करणार.' आणि त्याप्रमाणे त्याने क्षेत्ररक्षकांची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली.

दुसरे आश्चर्य म्हणजे भंडारीलासुद्धा रांगणेकर डाव्या हाताने गोलंदाजी करणार याची आगाऊ कल्पना नव्हती. रांगणेकरने पूर्वी कधीच अशी गोलंदाजी केली नव्हती आणि अशा महत्त्वाच्या प्रसंगी त्याने हा प्रयोग करावा हे अर्थातच भंडारीला आवडले नाही. पण एकदा एखाद्या खेळाडूला गोलंदाजी दिली तर ती काढून घेता येत नाही, आणि त्यातून रांगणेकरचा हा शेवटचा सामना. 'सध्यापुरती एखादी ओव्हर टाकू दे' असा मनाशी निर्णय करून त्याने रांगणेकरला 'सुरू कर' अशी सूचना दिली. आणि मग ते अभूतपूर्व घटनाक्रम सुरू झाले.

उजव्या हाताचा सराव असलेला गोलंदाज एकाएकी डाव्या हाताने बोलिंग कशी करू शकेल? केलीच तरी ती नेहमीप्रमाणे अचूक आणि प्रभावी असणार नाही अशी सर्वांची अपेक्षा होती. ही ओव्हर भारताला भलतीच महाग जाणार अशी अटकळ रेडिओ आणि टी.व्ही.चे कॉमेंटेटर करत असतानाच रांगणेकरच्या पहिल्याच चेंडूने एम.सी.सी.च्या फलंदाजाची विकेट उडाली! पॅव्हिलियनकडे परतताना नवीन फलंदाजाला 'चेंडू फारच अनपेक्षित आला. काळजी घे,' अशी त्याने सूचना केली. परंतु दोन चेंडू कसेबसे टोलावून तो फलंदाजही विकेट गमावून परतला. आणि त्या महाग ठरणाऱ्या ओव्हरच्या शेवटच्या चेंडूला रांगणेकरने एम.सी.सी.च्या कर्णधाराला – अनुभवी फलंदाज हेडलेला – पॅव्हिलियनची वाट दाखवली. प्रेक्षकांत भयंकर खळबळ माजली. परंतु ही फक्त सुरुवातच होती.

रांगणेकरच्या उजव्या हाताच्या गोलंदाजीचा भरपूर सराव असलेले एम.सी.सी.चे फलंदाज त्याच्या डावऱ्या गोलंदाजीपुढे अक्षरशः कोलमडून

पडले. त्यांचा पहिला डाव ७८ धावांवर आणि दुसरा डाव ४५ धावांवर आटोपला. त्यांच्या एकुलत्या एक डावऱ्या फलंदाजाने – जोन्सने – थोडाबहुत प्रतिकार केला नसता तर एवढ्या धावासुद्धा झाल्या नसत्या! रांगणेकरच्या गोलंदाजीचे पृथक्करण मात्र अभूतपूर्व होते : पहिली इनिंग १५ ओव्हर्स, ५ मेडन्स, २० रन्स, १० विकेट आणि दुसरी इनिंग १० ओव्हर्स, ३ मेडन्स, १५ रन्स, १० विकेट.

कसोटी सामना चहापानापूर्वीच आटोपला. अभिनंदन करणाऱ्या प्रेक्षकांपासून बचाव करण्यासाठी रांगणेकरला 'पोलीस एस्कॉर्ट' देण्यात आला. त्याची मुलाखत घेण्यासाठी वार्ताहरांचा गराडा त्याच्याभोवती पडला. पण 'मी फार दमलोय – उद्या तुम्हाला भेटेन' अशी सूचना देऊन मैदानाबाहेर उभ्या असलेल्या एका बंद अँब्युलन्समधून तो पसार झाला. अँब्युलन्समध्ये पांढराशुभ्र युनिफॉर्म घातलेली एक व्यक्ती वृत्तपत्रांच्या लोकांना ओझरती दिसली आणि ती डॉक्टर असावी असा त्यांनी तर्क केला.

त्यानंतर एक आठवडाभर रांगणेकर अज्ञातवासात होता. भारतीय संघाला, कंट्रोल बोर्डाला, पोलिसांना, कोणालाच तो कुठे आहे याची माहिती नव्हती. त्याला घेऊन गेलेली अँब्युलन्स निनावी असून शहरातल्या कुठल्याही नर्सिंगहोममध्ये किंवा हॉस्पिटलमध्ये त्याला घेऊन गेली नव्हती. मात्र 'मी सुरक्षित आहे आणि २८ डिसेंबरला प्रगट होईल. तोपर्यंत मला शोधण्याचा प्रयत्न करू नये,' असा एक संदेश त्याच्यातर्फे एका अज्ञात इसमाने पोलिसांकडे आणि मोठ्या वर्तमानपत्रांकडे पाठवला.

दरम्यान, क्रिकेटचे शौकीन आणि टीकाकार त्या अभूतपूर्व सामन्याचा आढावा घेण्यात गुंतले होते. 'इंडियन रोप ट्रिक', 'जिम लेकरचा सवाई रांगणेकर', 'क्रिकेट की मेस्मेरिझम?' अशा तऱ्हेच्या अनेक मथळ्यांखाली रांगणेकरच्या गोलंदाजीची चर्चा झाली. त्याच्या गोलंदाजीची फिल्म स्लो मोशनवर उलटीसुटली अनेक वेळा तपासून झाली. तज्ज्ञांना त्यात 'थ्रोइंग' किंवा इतर कुठलेही वैगुण्य आढळले नाही. त्यात सराईतपणा होता आणि तो मुळात डावरा नसलेल्या माणसात एकाएकी कसा आला याचे सर्वांनाच कोडे पडले.

२८ डिसेंबरला रांगणेकर एका पोलीसस्टेशनवर दाखल झाला. गेला आठवडा आपण कोठे होतो हे त्याला बिलकूल आठवत नव्हते. फार काय, स्वतःच्या पराक्रमाचीसुद्धा त्याला माहिती नव्हती! एरव्ही त्याच्यात कुठलाही

शारीरिक दोष नव्हता. २१ डिसेंबरपूर्वीच्या आणि २८ डिसेंबरनंतरच्या घटनांची स्मृती त्याच्या मेंदूत होती. फार काय, आपल्याला डाव्या हाताने गोलंदाजी करता येते ही कल्पनाच त्याला हास्यास्पद वाटली. त्यामुळे त्याच्या पराक्रमाचे कोडे उलगडू शकले नाही आणि वेगवेगळ्या कल्पनांना वाव मिळाला.

२१ ते २८ डिसेंबरच्या आठवड्यात रांगणेकरच्या आयुष्यात काय घडले होते? खरा प्रकार कळल्यापासून सत्य हे मानवी कल्पनेपेक्षा विलक्षण असू शकते याची मला खाली पटली.

५ फेब्रुवारी २००५ ही तारीख माझ्या सदैव स्मरणात राहील. त्या दिवशी सकाळी आठ वाजता मला संजू गोळेचा फोन आला. जवळजवळ पाच वर्षांनी मी त्याचा आवाज ऐकत होतो.

"प्रताप, मी तुला आज रात्री भेटायला येऊ का? नऊच्या सुमाराला? फार जरूरीचं काम आहे."

"हो, जरूर ये. जेवायलाच ये." मी आग्रह केला. "पण कशासाठी तुला माझी आठवण झाली हे तरी सांगशील का?" मी विचारले.

"प्रमोदसंबंधी तुला काही सांगायचं आहे. आणखी पुष्कळ चर्चा करायची आहे. पण हे सर्व गुप्त ठेव. जेवायला इतर कोणाला बोलावू नकोस."

"बरं बरं! आणखी काही सूचना?" मी थट्टेने विचारले.

"होय. वहिनींना म्हणावं, मला जेवायला काटासुरी लागते." ह्या चमत्कारिक सूचनेला जास्त खुलासा न करताच संजूने फोन बंद केला.

संजू, प्रमोद आणि मी शाळेत एकत्र शिकलो आणि खेळलो. आमचे त्रिकूट शाळेत प्रसिद्ध होते. जीवश्चकंठश्च मित्र असलो तरी आमचे स्वभाव अगदी वेगळे होते आणि आमची गती वेगवेगळ्या विषयांत होती. मी स्वभावाने हळवा आणि कलात्मक विषयांत रस घेणारा, तर संजू अबोल आणि विज्ञानाची व गणिताची आवड असलेला. त्याउलट प्रमोद बहिर्मुख आणि खेळांत पुढाकार घेणारा म्हणून प्रसिद्ध. कॉलेजपर्यंत आमचे त्रिकूट कायम राहिले. पुढे प्रमोदने बँकेत नोकरी करून क्रिकेटमध्ये नाव मिळवले. मी एका प्रख्यात म्युझियमची क्युरेटरशिप पत्करली. आणि संजू? विज्ञानाचे उच्च शिक्षण घेऊन त्याने डिफेन्स लॅबोरेटरीमध्ये नोकरी मिळवली आणि तिथल्या गुप्त रिसर्च प्रॉजेक्ट्समध्ये तो असा गडप झाला की गेली अनेक वर्षे आमची दोघांची एका शहरात असूनही गाठ पडली नव्हती.

परंतु त्याच्या बोलण्याला मान द्यायचे माझ्या अंगवळणी पडले होते. म्हणून त्याची सूचना आम्ही तंतोतंत पाळली. इतर कोणाला बोलवायचा मोह मी टाळला आणि त्याच्या आग्रहाप्रमाणे माझ्या पत्नीने पाश्चात्त्य पद्धतीचे जेवण तयार केले. नाहीतरी पाश्चात्त्य पाककृती करून दाखवायचे फारसे प्रसंग येतच नाहीत, अशीच तिची तक्रार होती. संजूसाठी प्रॉन कॉकटेल, कॉकोव्हाँ आणि क्रेप सुझेट असा उत्कृष्ट बेत तिने केला.

प्रमोदसंबंधी संजू काय सांगणार असेल याचा तर्क करण्यात माझा सबंध दिवस गेला. अनेकांनी त्याच्याबद्दल उलटसुलट विधाने केली होती. त्यांच्यात हा आणखी काही भर घालणार आहे का? पण वैज्ञानिक प्रवृत्तीचा आणि मूळचा अबोल असा संजू आपण होऊन या विषयावर बोलू इच्छितो त्या अर्थी त्याला नक्कीच काहीतरी महत्त्वाची माहिती सापडली असणार. तो येईपर्यंत माझी उत्सुकता शिगेला पोचली होती.

ठरल्या वेळी दाराची घंटा वाजली आणि संजू उगवला. एखाद्या परिचित माणसाला अनेक वर्षांनी पाहिल्याबरोबर त्याच्यात थोडाफार बदल झालेला वाटतो त्याप्रमाणे संजूही थोडा बदललेला दिसला. पूर्वीच्यापेक्षा जास्त प्रौढ आणि गंभीर वाटला. परंतु आणखी कसलातरी वेगळाच बदल त्याच्यात झालेला आहे असे माझे अंतर्मन सांगत होते – पण तो नेमका कुठे आहे ते मलाच सांगता येत नव्हते! त्याचे बोलणेचालणे नेहमीप्रमाणे होते आणि पूर्वीच्या गप्पागोष्टींत मी माझा प्रथमदर्शनी झालेला ग्रह विसरून गेलो.

जेवण उत्तम प्रकारे पार पडले. गेली पाच वर्षे काय करत होतास, कसले शोध लावलेस वगैरे माझ्या आणि हिच्या प्रश्नांना गुळमुळीत उत्तरे देऊन संजू आम्हा दोघांनाच जास्त बोलायला लावत होता. हिच्या पाककौशल्याची स्तुती करणे आणि त्याचा माझ्या स्थूलपणाशी संबंध जोडणे, आमच्या मुलांची चौकशी, तिचे सोशल सर्व्हिसचे अनुभव वगैरे विषय तिला बोलायला उद्युक्त करायला पुरेसे होते. परंतु माझे मात्र समाधान झाले नाही. तो स्वतःबद्दल बोलायचे मुद्दाम टाळतो आहे अशी मला दाट शंका येत होती. शिवाय, नेहमी भरभर जेवणारा संजू आज इतक्या सावकाश का जेवतो आहे? पूर्वीप्रमाणे त्याची नजर भेदक नसून स्वप्नाळू का वाटते?– अशा लहानसहान शंका मधूनमधून माझ्या मनात येत होत्या आणि मी त्या दूर सारत होतो.

जेवण संपताना मात्र त्या शंकांना पुष्टी देणारी, एक किंचित विसंगत अशी घटना घडली.

माझा बारा वर्षांचा मोठा मुलगा अरुण एक गोष्टींचे पुस्तक घेऊन आला. पाच वर्षांपूर्वी त्याची आणि संजूची मोठी दोस्ती होती.

"संजूकाका, हे पुस्तक तुम्ही मला मागं प्रेझेंट केलं होतं. पण तुम्ही किती विसराळू! 'चि. अरुणला सप्रेम भेट' असं लिहिलंत आणि सही मात्र करायला विसरलात! आता करा पाहू सही."

संजूने ते पुस्तक हातात घेऊन पाहिले न पाहिल्यासारखे करून परत दिले. "अरुण बेटा! मी आज सही करत नाही. पुन्हा येईन तेव्हा करीन. आज माझे डोळे दुखताहेत."

"अरे, नुसती सही करायला कसली सबब पुढं करतोस! सही तर डोळे मिटूनदेखील करता येते!" मी संजूला हटकले.

"तसं नाही रे! डॉक्टरनं मला बिलकूल लिहायचं नाही अशी सक्त ताकीद दिली आहे. हे बघ अरुण, मी पुन्हा येईन तेव्हा सही तर करून देईनच; शिवाय तुला आणखी एक प्रेझेंट आणीन."

अरुण थोडा नाखूष होऊनच गेला.

जेवण संपल्यावर संजू आणि मी माझ्या अभ्यासिकेमध्ये आमच्या गुप्त चर्चेसाठी गेलो. अभ्यासिकेचे दार बंद करून मी लगेच माझ्या मनातला प्रश्न संजूपुढे टाकला.

"प्रमोदसंबंधानं तू काय सांगणार आहेस?"

संजू एका आरामखुर्चीवर टेकून शांतपणे उद्गारला, "जरा दमानं घे प्रताप! मला बरंच काही सांगायचंय आणि प्रमोदचं प्रकरण त्यात ओघाओघानं येईलच. प्रथम मला ह्याच्यावर आपलं मत दे." असे म्हणून त्याने खिशातून एक पॅकेट काढले आणि काळजीपूर्वक उघडले.

त्यात एक नाचणाऱ्या गणपतीची सुरेख पण लहानशी प्रतिमा होती. त्याची घडण, कारागिरी सर्व माझ्या परिचयाची होती. कारण तसलीच एक प्रतिमा आमच्या म्युझियममध्ये होती. ती प्रतिमा पेशवाईच्या काळातली असून, एके काळी शनिवारवाड्यातल्या पेशव्यांच्या एका देवघरात विराजत होती असे तज्ज्ञांचे मत होते. ती प्रतिमा आमच्या म्युझियममध्ये कशी आली हा एक मोठा इतिहास आहे, पण त्याच्याशी आपल्याला कर्तव्य नाही. परंतु तसलीच प्रतिमा संजूकडे कशी आली? नव्हे, चुकलो! ती प्रतिमा एका अर्थाने वेगळी होती. तो गणपती उजव्या सोंडेचा होता.

उजव्या सोंडेचे गणपती दुर्मिळ असले तरी अस्तित्वात आहेत. तरीपण पेशवाईच्या काळातला आणि मुळातच दुर्मिळ असलेला गणपती संजूने कुठे मिळवला? तो नकली माल नव्हे हे माझ्यातल्या तज्ज्ञाने केव्हाच ओळखले होते. तरी मी माझी उपकरणे वापरून त्याची शहानिशा केली.

''काय क्युरेटरसाहेब! आहे की नाही ही एक दुर्मिळ वस्तू?'' मिश्किलपणे हसत संजूने विचारले.

''होय, आहे खरी! ती इतकी दुर्मिळ आहे की ती नकली असावी असा मला प्रथम संशय आला. परंतु हा खरा माल आहे असं मी खात्रीपूर्वक सांगू शकतो. फार काय, असलाच डाव्या सोंडेचा गणपती माझ्या म्युझियममध्ये आहे.'' मी माझे मत दिले.

''खरं की काय?'' संजूच्या उद्गारात मला आश्चर्यापेक्षा मिश्किलपणा दिसला. ''बरं, सवडीने तो मला तू दाखव! पण मला तर शंका वाटते की तसला गणपती तुझ्याकडे असेल. मात्र हा गणपती तुझ्या म्युझियमला माझी भेट म्हणून ठेव.''

''म्युझियमच्या ट्रस्टींच्यातर्फे तुझे आभार मानतो संजू! त्यांचं तुला पत्र येईलच. तुला कल्पना नाही ही किती मोलाची वस्तू तू म्युझियमला देत आहेस.'' माझा स्वर भारावून गेला. ''पण मला हे सांगशील का, की हा गणपती तुझ्याकडे कसा आला? म्युझियममध्ये असलेल्या दुर्मिळ वस्तूंबद्दल हे कुतूहल सर्वांनाच असतं.''

''तो इतिहास मी तुला सांगतो. पण तो तुला गुप्त ठेवावा लागेल.'' संजू उद्गारला. ''शिवाय त्याचा प्रमोदच्या पराक्रमाशी संबंध आहे.''

गणपतीप्रकरणामुळे मी मूळचा मुद्दा जवळजवळ विसरूनच गेलो होतो. संजूच्या उद्‌गाराने माझे कुतूहल कमालीचे वाढले.

''गणपतीचा इतिहास सांगण्यापूर्वी मी तुला आणखी एक प्रश्न विचारतो. तू माझा लहानपणापासूनचा मित्र आहेस. प्रताप, तुला जर कोणी विचारले की संजूला ओळखण्यासाठी त्याच्या शरीरावर काही खूण आहे का, तर तू काय उत्तर देशील?''

ह्या प्रश्नाने माझे कुतूहल आणखीच वाढले. प्रमोदची गोलंदाजी, उजव्या सोंडेचा गणपती आणि हा प्रश्न यांचा संबंध काय? माझे डोके गरगरायला लागले. तरी संजूच्या प्रश्नाचे उत्तर मला माहीत होते.

''तुझ्या डाव्या दंडावर फुलपाखरासारखी दिसणारी एक जन्मखूण आहे. लहानपणी मी आणि प्रमोदनं तुझी त्यावरून बरीच थट्टा केली होती.''

संजूने आपल्या शर्टाची डावी बाही वर केली. ती जन्मखूण दंडावरून नाहीशी झाली होती. माझे डोके जास्तच गरगरायला लागले आणि मग संजूने शांतपणे आपल्या उजव्या दंडाकडे बोट दाखवले.

ती जन्मखूण उजव्या दंडावर होती.

''अरे पत्या, ऊठ लेका! किती कुचकामाचा तू.'' संजू मला शुद्धीवर आणायचा प्रयत्न करत होता. क्षणभर मला वाटले की मी झोपेतून उठत आहे आणि मला कसले तरी विचित्र स्वप्न पडले आहे. खरे म्हणजे माझी शुद्ध हरपली होती संजूशी चर्चा करताना.

''सॉरी! माझ्या गोष्टींचा तुझ्यावर इतका परिणाम होईल याची मला कल्पना नव्हती. मी हाडामांसाचा संजूच आहे – भूतबीत नव्हे.''

''मग तुझी जन्मखूण कशी बदलली?'' मी भीतभीतच विचारले. उत्तरादाखल संजूने माझा हात पकडून स्वतःच्या छातीवरून सावकाश फिरवला. त्याचे हृदय उजवीकडे धडधडत होते!

प्रमोदची डावरी गोलंदाजी, उजव्या सोंडेचा गणपती, उजवीकडे हृदय असलेला संजू या वेगवेगळ्या गोष्टींतून कसला तरी धागा जात आहे याची मला अंधुकशी कल्पना येऊ लागली. ही सर्व आरशातली प्रतिबिंबे असावीत असा एक वेडसर विचार मनात येऊन गेला. हाडामांसाची किंवा भरीव प्रतिबिंबे? गणपती मी हाताळला होता. संजूला चाचपून पाहिले होते. फलंदाजांना बाद करताना प्रमोदला मीच नव्हे तर अनेकांनी पाहिले होते. फार काय निर्जीव टी.व्ही.नेसुद्धा! ती आरशातली प्रतिबिंबे नव्हती, तर विश्वात प्रत्यक्ष अस्तित्व असलेल्या गोष्टी होत्या!

तरीपण मी संजूला आरशासमोर उभे केले आणि मला प्रथमदर्शनी झालेल्या शंकेचे समाधान झाले. आरशातला संजू मला जास्त परिचयाचा वाटला. प्रतिबिंबावरून आपण कसे दिसतो याची आपल्याला कल्पना येते. परंतु मूळ व्यक्तीत आणि तिच्या प्रतिबिंबात थोडेफार फरक असतातच. माझ्या अंतर्मनाला वाटलेला फरक संजूचे प्रतिबिंब आणि मूळ संजू यांच्यातला होता. आज माझ्याकडे आलेला संजू मूळचा संजू नसून त्याचे हाडामांसाचे प्रतिबिंब होते. पण हे कसे शक्य झाले? आणि मूळचा संजू कुठे गेला?

''तुला वाटतं, की मी कोणीतरी वेगळा प्राणी संजूचं प्रतिबिंब बनून आलेला आहे?'' संजूने किंवा त्या 'जीवा'ने माझी विचारशृंखला बरोबर

ताडली. "नाही. मी मूळचा संजूच आहे. फक्त माझं माझ्या प्रतिबिंबात रूपांतर झालेलं आहे."

"पण हे कसं शक्य झालं?"

"तेच सांगायला मी येथे आलो आहे. मी सांगतो ती गोष्ट सत्य आहे – मग तुला ती खरी वाटो न वाटो. मात्र तिला तुझ्या पलीकडे जाऊ देऊ नकोस."

संजूने सांगितलेला आश्चर्यजनक वृत्तांत त्याच्याच शब्दांत देतो :

"तुला आठवत असेल, मी पाच वर्षांपूर्वी एका सरकारी जागेकरता अर्ज केला होता. त्या जागेसाठी शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ असलेल्या माणसाची आवश्यकता होती आणि काम गुप्त स्वरूपाचं होतं. फंडामेन्टल फिजिक्स आणि इलेक्ट्रॉनिक्स या दोन्ही विषयांत मी उच्च शिक्षण मिळविलेलं असल्यानं मला ती जागा सहज मिळाली.

महत्त्वाचं काम करायला मिळणार म्हणून मी प्रथम उत्साहात होतो. पण लवकरच माझ्या आनंदावर विरजण पडलं. माझ्या कामात डेस्कवर्क जास्त आणि प्रयोगशाळेतलं काम कमी होतं. त्याशिवाय लाल फीत, वरिष्ठांची हुकमत आणि मर्जी सांभाळणं, नवीन कल्पना वापरायला निरुत्साह, सहकाऱ्यांचे हेवेदावे वगैरे प्रकार येथेसुद्धा मला आढळले. त्यामुळं मी इतरांच्याशी संपर्क कमी केला – फक्त कामापुरता त्यांच्याशी संबंध ठेवला. माझे बहुतेक सहकारी गप्पागोष्टी, चहापाणी ह्याच्यातच वेळ खर्च करायचे. मी मात्र माझे स्वतःचे अध्ययन आणि प्रयोग यांच्यात जास्त वेळ घालवीत असे. मला दिलेले ऑफीसचे काम मी व्यवस्थित पूर्ण करत असल्याने माझ्याविरुद्ध तक्रारींना वाव नव्हता. त्यामुळं मी माझा इतर वेळ कसा खर्च करतो इकडे कोणी लक्ष दिलं नाही.

गुरुत्वाकर्षण आणि मूलकण यांच्याविषयी मला स्वतःला संशोधन करायचं होतं. गेली कित्येक वर्षं एक विलक्षण कल्पना माझ्या मनात येत असे; तिला मूर्त स्वरूप देण्याचा मी निर्धार केला. त्यासाठी लागणारी उपकरणं आमच्या प्रयोगशाळेत उपलब्ध होती. माझ्या प्रयोगाविषयी सांगण्यापूर्वी ती मूळ कल्पना थोडक्यात सांगतो.


आइन्स्टाईनच्या गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणं अवकाश आणि काल (Space and Time) यांचे गुण त्यात उपस्थित असलेल्या वस्तूंवर अवलंबून असतात. जर एखाद्या भागात कोणतीही वस्तू नसेल तर तेथील अवकाश आणि काळ यांची भूमिती युक्लिडची असते. जी आपण प्रथम शाळेत

शिकतो. याउलट, जर त्या अवकाशात एखादी मोठ्या वस्तुमानाची, मोठ्या ऊर्जेची वस्तू ठेवली तर त्या भागातली भूमिती बदलते. त्यातील सरळ रेषांची दिशा बदलते. आपण म्हणतो की प्रकाश सरळ रेषेत जातो; पण एखाद्या मोठ्या वस्तू शेजारून जाताना प्रकाशाची दिशा बदलते. खगोलशास्त्रातील वेधांनी अशा तऱ्हेचे परिणाम शास्त्रज्ञांनी पडताळून पाहिले आहेत आणि हे सर्व परिणाम 'वस्तुजनित गुरुत्वाकर्षणामुळं अवकाशकालाचं वक्रीकरण होतं' या आइन्स्टाईनच्या सिद्धांतावर आधारलेले आहेत.


मी तुला वक्रीभूत अवकाश-काल, त्यातील वेगळ्या भूमितीचे नियम वगैरे सांगून बोअर करू इच्छीत नाही. पण मला सुचलेली कल्पना सांगण्यापूर्वी ही प्रस्तावना करणं आवश्यक होतं. कारण मला यापुढची पायरी गाठायची होती. ती म्हणजे अवकाश-कालाला 'पीळ' पाडण्याची.

तू मोबियसच्या पट्टीचं नाव ऐकलं असशील. पँटचा पट्टा जर आपण सपाट टेबलावर पसरला तर त्याचे पृष्ठभाग (खालचा आणि वरचा असे दोन पृष्ठभाग त्याला असतात) समतल असतात. त्यांना युक्लिडची भूमिती लागू पडते. तोच पट्टा जर कमरेभोवती बांधला तर त्याचे वक्रीकरण होते आणि त्याला 'अयुक्लिडीय' भूमितीचे नियम लागू होतात. पण पूर्वीप्रमाणंच त्याला दोन पृष्ठभाग असतात - आतला आणि बाहेरचा. आता त्यापुढची पायरी म्हणजे त्या पट्ट्याला एक पीळ देऊन कमरेभोवती बांधण्याची. या पट्ट्याला आता एकच पृष्ठभाग असतो! हीच मोबियसची पट्टी.

समज, पट्टीवर सरपटणारे चपटे जीव आहेत. त्यांना लांबी आणि रुंदी आहे, पण उंचीची कल्पना नाही. असा एक मनुष्याकृती जीव-पण फक्त डावा हात असलेला - त्या पट्टीवर राहतो. तो एकाच ठिकाणी त्या पट्टीवर किती जरी गोलगोलं फिरला तरी डावरा तो डावराच राहणार. पण जर तो त्या पट्टीवर एक सबंध फेरी मारून आला तर त्याचा डावा हात जाऊन उजवा हात आलेला असेल! तुला खरं वाटत नसेल तर कागदाची मोबियस पट्टी तयार करून त्यावर असा जीव फिरवून तुला सहज माझं विधान तपासून पाहता येईल. हे चित्र पाहाः



त्या सरपटणाऱ्या चपट्या जीवाला वाटणारा चमत्कार आपल्याला मात्र चमत्कार वाटत नाही, कारण आपण त्या पट्टीकडे तीन परिमाणे म्हणजे लांबी, रुंदी आणि उंची असलेल्या अवकाशात पाहतो. त्या पट्टीला असलेल्या पिळामुळे तो चपटा माणूस त्याच्या आपादमस्तक रेषेभोवती निम्मा फिरवला जातो आणि त्यामुळं त्याचा डावा हात उजवीकडे जातो. हे चित्र पाहा :



समजा, असाच पीळ आपल्या तीन परिमाणांच्या अवकाशात पडला तर? आपल्यासारख्या लांबी–रुंदी–उंची असलेल्या माणसांनासुद्धा तोच चमत्कार दिसून येईल. विशिष्ट प्रकारचा पीळ असलेल्या अवकाशातून चक्कर मारून आल्यावर कुठल्याही वस्तूचे तिच्या प्रतिबिंबात रूपांतर होईल. अर्थात हा प्रकार आपल्याला डोळ्यांपुढं आणता येत नाही, कारण त्यासाठी चौथ्या परिमाणाची जरुरी आहे. पण गणितज्ञांना गणिताच्या रूपानं ह्या प्रकाराचं चित्रण करता येतं. जे आपल्या इंद्रियांच्या अनुभवापलीकडचं आहे ते अमूर्त गणिताला सहज साध्य होतं!

हा सर्व झाला कल्पनाशक्तीचा खेळ. अवकाशात खरोखर असा पीळ निर्माण करता येईल का? ह्याविषयी अनेक शास्त्रज्ञांनी सिद्धांत मांडले आहेत. ते सर्व अपरिपक्व असून, अजून त्यांना मान्यता मिळालेली नाही. पण त्या सर्वांच्या मुळाशी एक कल्पना आहे. ती म्हणजे मूलकणांचा उपयोग करून पीळ निर्माण करण्याची शक्यता. काही विशिष्ट मूलकणांमध्ये फिरकी (Spin) सारखे काही आंतरिक गुण आहेत. 'फिरकी' हा शब्द जरी आपल्या दैनंदिन जीवनातल्या एखाद्या अक्षाभोवती फिरणाऱ्या वस्तूंवरून घेतला असला तरी मूलकणांच्या संदर्भात त्याला वेगळा अर्थ येतो. आणि अमूर्त स्वरूपाच्या वेगळेवेगळ्या फिरक्या मूलकणांच्या गणितात असतात. एका विशिष्ट तऱ्हेची फिरकी असलेले मूलकण मोठ्या संख्येने अवकाशात सोडले तर पीळ निर्माण

होण्याची शक्यता असते, असा कयास केला जातो. मात्र हे सर्व मूलकण एकजुटीने फिरकी करणारे पाहिजेत. ते वेगवेगळ्या दिशेने फिरकी करत असले तर त्यांचा परिणाम होत नाही.

आमच्या प्रयोगशाळेत मूलकणांचे झोत तयार करणारं मोठं यंत्र असल्यानं अशा तऱ्हेचे झोत तयार करून पाहण्याचं मी ठरवलं. नवीन प्रयोग करायला सरकारी लाल फितीला तोंड देण्याचा धीर माझ्यात नव्हता. माझं प्रपोजल वेगवेगळ्या फायलींतून प्रवास करून नकारघंटा घेऊन परत येईपर्यंत मी निवृत्त होण्याची वेळ आली असती! त्या फाइलवाल्यांच्या समाधानासाठी मी हा प्रयोग माझ्या नेहमीचा सरकारी कामाचाच एक भाग आहे अशी थाप मारली आणि त्या मूलकणांच्या यंत्राशेजारी एक कॅबिन माझ्यासाठी राखून घेतलं. त्यावर 'टॉप सीक्रेट', 'डेंजरस', 'डू नॉट एंटर' वगैरे पाट्या लावून मला कोणी त्रास देणार नाही याची काळजी घेतली.

सडाफटिंग असल्यामुळं मला हवा तेवढा वेळ प्रयोगासाठी काढता आला. पण मी हाती घेतलेलं काम अतिशय अवघड होतं. त्या यंत्रातून हव्या त्या अवस्थेत एकजुटीनं सर्व मूलकण बाहेर काढण्याच्या प्रयत्नात, रात्रीचा दिवस करूनही, मला दोन वर्षं लागली. शेवटी, जवळजवळ सहा महिन्यांपूर्वी मी त्यात यश मिळवलं.

माझ्या प्रयोगाकरता मी माझं रिस्टवॉच वापरलं. त्याचं प्रतिबिंबात रूपांतर होताना त्याची कालमानपद्धती बदलते का हे मला पाहायचं होतं. ते घड्याळ योग्य ठिकाणी ठेवून मी त्यावर मूलकणांचा झोत टाकला. घड्याळ त्या झोतामध्ये एका विशिष्ट वर्तुळाकृती मार्गानं फिरवल्याबरोबर एकदम त्याचं प्रतिबिंबात रूपांतर झालं आणि त्याच्या कालमानात फरक पडला नाही. प्रयोग यशस्वी झाल्याच्या आनंदात मी झोत बंद केला आणि घड्याळ पूर्ववत झालं! अजून रूपांतर टिकवण्यात मला यश आलं नव्हतं.

मी तोच प्रयोग वेगवेगळ्या पद्धतीनं करून पाहिला आणि शेवटी मला पूर्ण यश लाभलं. मूलकणांच्या झोतात घड्याळाचं रूपांतर झाल्यावर तो झोत बंद करण्यापूर्वीच ते घड्याळ बाहेर काढलं की त्याचं रूपांतर टिकून राहायचं. मी हाच प्रयोग वेगवेगळ्या वस्तूंवर करून पाहिला, आणि मला प्रत्येक वेळी हा अनुभव आला. ह्या प्रकारामागं काय गूढ आहे ते मला अजून उकललेलं नाही.

चार डिसेंबरला मी हा प्रयोग स्वतःवर करून पाहायचं ठरवलं. अर्थातच त्यापूर्वी किडे, फुलपाखरं, गिनीपिग वगैरेवर प्रयोग करून जीवाला अपाय

होणार नाही याची मी खात्री करून घेतली होती. तरी पण जर काही कारणाने माझं बरंवाईट झालं तर इतर शास्त्रज्ञांना माझ्या संशोधनाचा फायदा मिळावा म्हणून मी प्रयोगाची सर्व तांत्रिक माहिती लिहून काढली आणि एका सुरक्षित ठिकाणी ठेवली आणि माझं रूपांतर झाल्यावर माझे त्या खोलीतले व्यवहार व्हिडीओ टेपवर रेकॉर्ड करण्याची व्यवस्था केली. शिवाय इतर यंत्रं माझ्या शरीरातल्या वेगवेगळ्या प्रक्रिया मोजूनमापून पाहणार होतीच. इतकी सर्व व्यवस्था करून मग मी त्या मूलकणांचा प्रवाह सुरू करून त्याच्यात प्रवेश केला.

त्या झोतामध्ये योग्य मार्गानं राउंड पुरा केल्यावर माझंसुद्धा प्रतिबिंबात रूपांतर झालं आणि मला ते होत असल्याची जाणीव झाली नाही! कसल्याही वेदना न होता, डोक्याला चक्कर न येता माझं रूपांतर झालं. माझ्याबरोबरच माझ्या अंगावरचे कपडे, घड्याळ, बूट सर्व त्याचप्रमाणं बदललं! मी झोताच्या बाहेर येऊन स्वतःचीच परीक्षा केली. मला अक्षरं वाचता येईनात – कारण माझ्या डोक्यात उलटी अक्षरं वाचायची माहिती उपलब्ध नव्हती. बाटलीचं झाकण स्क्रू करून उघडताना, बंद करताना माझा घोटाळा होई. कारण स्क्रूची रचना माझ्या डोक्यात आणि प्रत्यक्षात एकमेकांविरुद्ध होती. माझ्या उजव्या हातातला सराईतपणा जाऊन तो डाव्या हातात आला. मला अनुभवाला येणाऱ्या सर्व गोष्टींची मी नोंद केली. शिवाय यंत्रावर माझं निरीक्षण केलं जातच होतं.

शेवटी मी 'सुलटा' होण्यासाठी परत त्या झोतामध्ये शिरलो आणि बाहेर आल्यावर पूर्ववत झालो. पण माझ्या मेंदूवर एक परिणाम झालेला होता. माझी उलटेपणातली सर्व स्मृती पुसली गेली होती! मी प्रयोगाला सुरुवात करीपर्यंतची सर्व स्मृती शाबूत होती. पण प्रतिबिंबात्मक अवस्थेत मी काय केलं ते बिलकूल आठवत नव्हतं. मात्र व्हिडिओटेपवर मला ते सर्व रेकॉर्ड झालेलं पाहायला मिळालं. तसेच, माझे अनुभव, माझ्या हस्ताक्षरातलेच वाचायला मिळाले. पण ते वाचताना मला आरसा समोर धरावा लागला. कारण ती अक्षरं उलटी होती!''

संजूची सर्व हकीकत ऐकताना एक 'अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक कथा' ऐकतो आहे असे मला वाटत होते. पण त्यावर अविश्वास ठेवायला जागा नव्हती. कारण त्याचे प्रतिबिंबच माझ्या समोर बसले होते. त्याची गोष्ट चालू असताना माझी नजर त्या उजव्या सोंडेच्या गणपतीकडे गेली आणि माझ्या मनात एकाएकी एक विचार आला.

''थांब संजू! हा गणपतीसुद्धा रूपांतरितच आहे का?'' मी त्याला विचारलं.

"होय प्रताप! तुला खरं वाटत नसलं तर म्युझियममध्ये जाऊन खात्री करून घे." संजूच्या डोळ्यांत परत मिश्किलपणाची झाक दिसू लागली.

. मी त्याला घेऊन शेजारीच असलेल्या म्युझियमच्या इमारतीत गेलो. पेशवाईच्या काळातल्या वस्तूंच्या सेक्शनमध्ये जाऊन मी तिथल्या एका कॅबिनेटकडे धाव घेतली. तेथे डाव्या सोंडेच्या गणपतीची जागा रिकामी होती! मी संजूनं दिलेला गणपती तेथे ठेवला आणि मुकाट्यानं त्याला घेऊन माझ्या स्टडीमध्ये परत आलो.

"सॉरी! मी तुला फसवलं, प्रताप. तुला पाहिजे असल्यास मी तो गणपती पूर्ववत करून देईन. तुला भेटण्यापूर्वी थोडी गंमत करावी म्हणून मी गेल्या आठवड्यात तुझ्या म्युझियमला भेट देऊन तिथला गणपती लंपास केला. तोच आज तुला परत भेट म्हणून दिला." संजूने स्पष्टीकरण केले.

माझे डोके आता काम करायला लागले होते. प्रमोद रांगणेकरचा विक्रम त्याने केला नसून त्याच्या प्रतिबिंबाने केला असणार! तरीच तो डाव्या हाताने सराईतपणे बोलिंग करू शकला, आणि त्याचे ते अनपेक्षित तऱ्हेचे बोलिंग एम.सी.सी.च्या खेळाडूंना अवघड वाटले. मी माझा तर्क संजूला सांगितला.

"बरोबर आहे. प्रमोद वीस तारखेला संध्याकाळी माझ्याकडे आला. तो फार उदास मनःस्थितीत होता. त्याची शेवटची मॅच असून ती स्मरणीय व्हावी अशी त्याची इच्छा होती. पण ते शक्य दिसत नव्हतं. त्याची बोलिंग पूर्वीसारखी प्रभावी पडत नव्हती, कारण ती प्रतिस्पर्ध्यांच्या परिचयाची झाली होती. दुसऱ्या दिवशी त्याला बोलिंग करायची होती आणि ती यशस्वी झाली नाही तर टीकाकार आपल्याला फार त्रास देतील अशी त्याला भीती वाटत होती." संजू म्हणाला. तो पुढे काय सांगणार याकडे माझे सर्व लक्ष होते. तो पुढे म्हणाला, "प्रमोदशी बोलताना माझ्या मनात एक विलक्षण कल्पना आली. समजा, आपण त्याचं प्रतिबिंबात रूपांतर केलं तर?" अर्थात मी माझं गुपित त्याला सांगणार नव्हतो.

मी त्याला कॉफीमधून झोपेचं औषध दिलं. तो निद्राधीन झाल्यावर कारमधून त्याला प्रयोगशाळेत आणलं. एखाद्या 'टॉप सीक्रेट' प्रयोगशाळेत बाहेरच्यांना मज्जाव असतो. परवानगीशिवाय आत येता येत नाही. पण हे नियम कसे मोडायचे ते मला समजलं होतं आणि प्रमोदला आत घेऊन जाताना मला कसलाही त्रास झाला नाही. त्याचं प्रतिबिंबात रूपांतर करून मी त्याला त्याच्या घरी पोचवलं.

दुसऱ्या दिवशी त्याचा फोन आला. तो फार हिस्टेरिकल झालेला होता. 'आपला उजवा हात फार अशक्त झालाय, डोळ्याला वाचताना अक्षरं उलटी दिसतात' वगैरे तक्रारी करून मी आदल्या रात्री त्याला काही भयंकर औषध दिलं होतं का अशी त्यानं पृच्छा केली. मी त्याच्या फ्लॅटवर जाऊन त्याला दिलासा दिला आणि उजवा हात अशक्त वाटत असला तर डाव्या हातानं बोलिंग कर असा सल्ला दिला. प्रथम त्याला मी थट्टा करतोय असं वाटलं. पण थोडी नेटप्रॅक्टिस केल्यावर त्याला माझ्या सल्ल्याचं महत्त्व पटलं. तो सल्ला किती प्रभावी ठरला हे तुला माहीतच आहे.

मॅचनंतर मीच त्याला घेऊन आलो. गावाबाहेर एका खेड्यात लहानशा झोपडीत त्याला मी सहा दिवस ठेवलं. कारण त्याच्या शरीरावर व मनावर फार ताण पडला होता. पोलीस आणि वृत्तपत्रांना फोन करणारा मीच होतो. सातव्या दिवशी तो जरा नॉर्मल झाल्यावर मी परत त्याचं रूपांतर करून त्याला शहरात आणून सोडला. अर्थात त्याला गेल्या सात दिवसांतील घटना काहीच आठवत नव्हत्या.''

प्रमोदच्या अभूतपूर्व गोलंदाजीचा खुलासा झाल्यावर मला इतर लहानसहान गोष्टींचा पण खुलासा झाला. आपला डावरेपणा उघडकीला येऊ नये म्हणून संजूने आमच्या घरी हाताने न जेवता काटासुरीची मागणी केली. तरीसुद्धा त्याला खायला वेळ लागत होता. त्याच कारणामुळे त्याने अरुणच्या पुस्तकावर सही करण्याचे नाकारले. आरशात दिसते तशी सही प्रत्यक्षात करणे किती अवघड आहे हे थोडा विचार केल्यावर लक्षात येते.

''संजू, तू लवकरात लवकर आपल्या शोधांना प्रसिद्धी दे. तुला नोबल प्राइझ नक्कीच मिळेल.'' मी त्याला सल्ला दिला.

''नाही प्रताप! तू म्हणतोस ते मला पटत नाही. एक तर अजून माझा शोध पूर्णावस्थेत गेलेला नाही. प्रतिबिंबावस्थेत असताना केलेले व्यवहार स्मृतिपटलावरून पूर्ण पुसले जातात ते का, त्याचं कारण आणि तसं होऊ नये ह्याला उपाय मला सापडले पाहिजेत. तरच मला समाधान वाटेल. मी आज तुझ्याकडे आलो, आपलं दीर्घ संभाषण झालं, मी केलेला खुलासा हे सर्व मी पूर्ववत झालो की विसरून जाणार ही माझ्या शोधातली अपूर्णता मला भरून काढायची आहे.'' संजूतला परफेक्शनिस्ट बोलत होता. ''त्या प्रयोगासाठी मला आमच्या लॅबोरेटरीतील दुर्मिळ अशी एक विशिष्ट वस्तू पाहिजे आहे. ती मिळवण्याच्या प्रयत्नात मी आहे.''

"कबूल आहे! पण एक व्यवहारी सल्ला तरी ऐकशील का?" मी कळकळीने विचारले, "तू ज्या अज्ञात शक्तीशी खेळत आहेस त्यात तुझं बरंवाईट होण्याची शक्यता आहे. निदान आपल्या आतापर्यंतच्या प्रयोगांचा अहवाल तरी व्यवस्थित लिहून एका सुरक्षित ठिकाणी ठेवून दे, म्हणजे तुझ्या शोधांना आणि जगाकडून मिळणाऱ्या श्रेयाला तू मुकणार नाहीस!"

"मला जगाकडून श्रेय नको की नोबेल प्राइझ नको. माझ्या अपेक्षा काही वेगळ्यांच आहेत, आणि त्यांत मला तुझी मदत लागणार आहे. मात्र तू म्हणतोस त्याप्रमाणं मी माझ्या प्रयोगांचा सविस्तर अहवाल लिहून ठेवला आहे, फक्त मलाच माहीत असलेल्या ठिकाणी! तो वाचून कोणालाही म्हणजे कोणाही तज्ज्ञ मनुष्याला प्रतिबिंबात रूपांतर करता येईल. तेथे 'पुष्पक विमान इफेक्ट' नाही!" संजू हसून उद्गारला.

'पुष्पक विमान इफेक्ट' हे शब्द आमच्या पूर्वीच्या चर्चेला अनुलक्षून होते. अनेक वर्षांपूर्वी, आपले पूर्वज खूप शिकलेले, विज्ञानात प्रगत असे होते असा मी आपल्याकडील पुराणग्रंथांच्या आधारे मुद्दा मांडला होता. त्याला संजूने दिलेले उत्तर समर्पक होते. पुष्पक विमान म्हणजे 'हेलिकॉप्टर', दूरवर इच्छित स्थळी जाणारी, घटोत्कचाला मारणारी इंद्राने दिलेली शक्ती म्हणजे 'गाइडेड मिसाइल' वगैरे दाखले शास्त्रज्ञाला पुरेसे नाहीत. जोपर्यंत ती कशी तयार करायची ह्याची शास्त्रीय माहिती पुराणग्रंथात सापडत नाही तोपर्यंत ती वस्तू शास्त्रज्ञाच्या दृष्टीने कविकल्पनाच ठरते. ह्या त्याच्या मुद्द्याला मला आजपर्यंत उत्तर सापडले नव्हते.

"माझी तुला कोणत्या प्रकारे मदत पाहिजे?" मी विचारले. माझ्या ज्ञानाचा किंवा अनुभवाचा त्याच्या शोधाशी कसा संबंध येत होता हे मला कळेना. संजूने त्याचा उलगडा केला.

"तू एका मोठ्या म्युझियमचा क्युरेटर आहेस. तरी मी केलेला उजव्या सोंडेचा गणपती बघून तू फसलास. तुला तो दुर्मिळ असा एक नवीन शोध वाटला. अशाच अनेक 'दुर्मिळ', 'अमोल' वस्तू तयार करून जगाकडून त्यांची किंमत वसूल करायचा माझा विचार आहे. एखादा स्टँप उलटा छापला की दुर्मिळ होतो. त्याला खूप किंमत येते. तुझ्याकडे खासगी कलेक्टर्सकडून दुर्मिळ वस्तूंबद्दल पृच्छा केली जात असणार. मी तयार केलेली वस्तू स्वतःच्या ऑथॉरिटीवर तू सहज खपवू शकशील. त्यात मिळणाऱ्या पैशात तुझी-माझी भागीदारी असेल."

संजूने केलेला प्रस्ताव मला पसंत पडला नाही. तो म्हणत होता त्याप्रमाणे पुराणवस्तूंच्या किंवा दुर्मिळ वस्तूंच्या बाजारात संजूला पुष्कळच पैसा कमवता आला असता. त्याने केलेली प्रतिबिंबे, अर्थात काही खास वस्तूंचीच, पण डोके वापरून वेगवेगळ्या कलेक्टर्सकडे मला खपवणे शक्य नव्हते. परंतु हा सर्वच प्रकार मला अनीतीचा वाटला. माझ्या अनुभवाचा, माझ्या मोठ्या पदाचा तो एक गैरवापर ठरला असता.

मी संजूशी बराच वाद घातला आणि त्याला ह्या मार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु एकदा डोक्यात घेतले की ते हट्टाने खरे करून दाखवायचे हा त्याचा अंगचा गुण पूर्वीसारखाच होता.

"बरं प्रताप! तुला नीतीच्या मार्गानं जायचं असलं तर खुशाल जा. मात्र मला तुझे उपदेशाचे डोस पाजू नको. निदान माझी सर्व हकीकत तरी गुप्त ठेवशील का?" शेवटी त्याने विनविले.

"तुझी हकीकत मी पूर्णपणे विसरून जायला तयार आहे. ती माझ्याकडून दुसऱ्या कोणाकडे जाणार नाही– काळजी करू नको."

आणि मग संजू माझा निरोप घेऊन गेला.

काही दिवसांनी डिफेन्स लॅबॉरेटरीत एक मोठी चोरी झाली. एक अत्यंत दुर्मिळ असा धातू तिथल्या एका सेफमधून चोरीला गेला. सेफचे कॉंबिनेशन फार थोड्या लोकांना माहीत होते आणि गंमत म्हणजे चोराने आपल्या हाताच्या बोटांचे ठसे सेफवर जसेच्या तसे ठेवले होते.

त्या धातूचा सामान्य माणसाला उपयोग होणार नाही आणि सेफचे कॉंबिनेशन गुप्त होते म्हणून ह्या चोरीमागे लॅबोरेटरीतला एखादा वैज्ञानिकच असावा असा पोलिसांचा अंदाज होता. परंतु बोटांचे ठसे, लॅबॉरेटरीतल्या कोणाही वैज्ञानिकाच्या किंवा तंत्रज्ञाच्या बोटांच्या ठशांशी जुळत नव्हते. त्याउलट, ती सेफ खास धर्तीची असून सामान्य चोराला ती उघडता आली नसती असा ती सेफ तयार करणाऱ्यांचा दावा होता.

मला मात्र वेगळाच संशय येत होता. हे काम संजूचे असावे. कारण त्याला प्रयोगासाठी काही विशिष्ट वस्तू हवी होती असे तोच बोलून गेला होता. ठसे सेफवर ठेवण्यामागे त्याची विकृत विनोदबुद्धी होती. ठशांचे प्रतिबिंब पाहायचे पोलिसांच्या कुठून डोक्यात येणार?

'डिफेन्स लॅबॉरेटरीत अपघात! शास्त्रज्ञांची परिस्थिती चिंताजनक!' हे शीर्षक

वर्तमानपत्रामध्ये पाहून हृदयात चर्र झाले. तो शास्त्रज्ञ कोण हे काही कारणास्तव गुप्त ठेवले जात होते. पण तो संजू असावा असे मला सारखे वाटत होते.

मी वशिला लावून बराच तपास केल्यावर माझी शंका खरी असल्याचे मला कळले.

संजू प्रयोग करत असताना एक मोठा स्फोट झाला आणि त्याच्या सर्व सामग्रीच्या ठिकऱ्या उडाल्या. खुद्द संजू नशिबवान म्हणून स्फोटाच्या मुख्य मारापासून वाचला. तरी जवळजवळ महिनाभर तो बेशुद्ध होता.

''संजू माझा जवळचा मित्र आहे आणि स्फोटाच्या काही दिवस आधी तो माझ्याकडे जेवायला आला होता.'' असे मी सांगताच त्याच्या डॉक्टरांनी मला मुद्दाम बोलावले. कारण स्फोटाच्या पूर्वी अनेक दिवस संजूशी बोललेले कोणीच त्यांना सापडले नव्हते. तो अत्यंत एकटेपणाचे जीवन जगत असून खुद्द प्रयोगशाळेतल्या सहकाऱ्यांशीसुद्धा बोलत नसे. संजू शुद्धीवर येण्याची शक्यता होती म्हणून मी त्या वेळी जवळ असावे अशी डॉक्टरांची इच्छा होती.

परंतु शुद्धीवर आल्यावर संजूने मला ओळखले नाही. आणि त्याचे कारण उमगायला फार वेळ लागला नाही. त्याचे स्मृतिपटल पूर्णतया पुसले गेले होते!

आपला प्रयोग संपूर्ण यशस्वी करण्यासाठी त्याने कसला तरी धाडशी प्रयत्न केला असणार. प्रतिबिंबातून मूळ स्वरूपात आल्यावर स्मरणशक्ती शाबूत राहावी हे ध्येय गाठताना तो आपली संपूर्ण स्मरणशक्ती गमावून बसला होता. त्याचे नशीब बलवत्तर म्हणून तो मूळ स्वरूपात तरी सुखरूप आला आणि त्याचा मेंदू इतर बाबतीत तरी व्यवस्थित आहे. पण स्वतः आपण किती महत्त्वाचा शोध लावला होता हे त्याचे त्यालाच माहीत नाही! त्याने लिहून ठेवलेली माहिती कुठल्या 'सुरक्षित' ठिकाणी त्याने ठेवली आहे? ती मिळेपर्यंत मला त्याने सांगितलेली हकीकत जगाला अविश्वसनीयच वाटणार.

जगालाच काय, मला स्वतःला कधीकधी ही सर्व हकीकत स्वप्नवत वाटते. प्रमोदच्या गोलंदाजी-प्रकरणाच्या मुळाशी इतकी विलक्षण घटना होती का? मी खरेच संजूला प्रतिबिंबावस्थेत पाहिले का?

शंकांचे काहूर उठले की मी म्युझियमकडे जाऊन स्वतःचे समाधान करून घेतो. कारण तेथे कोनाड्यात ह्या सर्व घटनेची साक्ष देत उभा आहे उजव्या सोंडेचा गणपती.